# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक २३/०५/२०२५

### खून करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन आजीवन कारावासाची शिक्षा

**पोलीस स्टेशन कन्हान** :— फिर्यादी नामे सौ हंसा बलेंद्र मालाधरे, वय ३६ वर्षे, रा. वार्ड कं.०३, धरमनगर, कन्हान ता. पारशिवणी यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कन्हान येथेअप क्र. २६१/२०२० कलम ३०२,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक २९/०७/२०१८ चे १७/१५ते १७/३० वाजेच्या दरम्यान नमुद गुन्हयातील दोन्ही विधी संघर्षीत बालक मोटार सायकल ने रोडवर पाय घासत जात असता यातील मृतक नामे अभिषेक बलेंद्र मालाधरे, वय १७ वर्षे, रा. वार्ड कं०३, धरमनगर, कन्हान ता. पारशिवणी व त्याच्या मित्र यांनी त्यांना हटकले असता त्यांच्यात झगडा भांडण होवून मारपिट झाली. त्यानंतर विधी संघर्षीत बालक क्र.०२ याने मृतकास 'रूक तुझे बताता हु' असे म्हणून घरी जावून आरोपी कं १ नामे **मुकेश लालाजी महातो वय ४९ वर्ष रा. रामनगर, पिपरी, कन्हान** आणि विधी संघर्षीत बालक क्र.०३यांचे सोबत संगनमत करून धरमनगर येथील हनुमान मंदीराचे समोरजावुन यातील मृतकास चाकुने वार करून गंभीर जखमी केले. मृतकाला मेयो हॉस्पीटल येथे उपचाराकामी नेले असता डॉक्टरांनीत्याला तपासुन मृत घोषीत केले, अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचा तपास सहा.पोलीस निरीक्षक नितीन आगाशे, पो. स्टे. कन्हान यांनी करून सदर प्रकरण न्यायदानासाठी मा. न्यायालयात दाखल केले होते.सदर प्रकरणात मा.सदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश कं ०६ श्रीमती एस.एम.बैस यांनी दिंनाक २३/०५/२०२५ रोजी नमुद **आरोपी नामे मुकेश लालाजी महातो, वय ४९ वर्षे,रा. रामनगर पिपरी कन्हान याला कलम ३०२,३४ भादवी मध्ये आजीवन कारावास व**

**२०,००० /—रू. दंड, दंड न भरल्यास ६ महीने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे**.

सरकारचे वतीने ए. पी. पी. श्रीमती सी.एस. पौनीकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस अंमलदार ईश्वर हुड पो.स्टे. कन्हान यांनी मदत केली आहे